रे. फौजदारी खटला क्र. <u>२४४/२०२३</u>
सरकार विरूद्ध निखील व अन्य एक
**निशाणी २०**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ ची जबानी</u>**

सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो/करते की,

माझे नाव : सुभाष वसंतराव तेलगोटे
वय : ५० वर्षे,
धंदा : शेत मजुरी,
राहणार : संविधान नगर, अकोट, ता. अकोट, जि. अकोला.

**सरतपासणी — अभियोगपक्षातर्फे विशेष सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. एस. राउत यांचेमार्फत —**

मी आरोपींना ओळखत नाही. मला पोलीसांनी पंचनामा करण्यासाठी बोलाविले नव्हते. मी मच्छी मार्केट मध्ये मासे घेण्यास गेलेलो असताना त्याठिकाणी पोलीसवाले आले व त्याठिकाणी त्यांनी माझ्या सह्या घेतल्या होत्या. माझे समक्ष पोलीसांनी कोणतीही जप्ती केली नाही. मी फिर्यादी काजल कहार हिला ओळखतो. ज्या पंचनाम्यावर मी सह्या केल्या तो कशा संदर्भात होता हे मला माहित नाही. आता मला घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखवला त्यातील मजकुर मला माहित नाही. त्यावर माझ्या सह्या आहेत. परंतु त्यातील मजकुर मला माहित नाही.

***(साक्षीदार पुर्वीच्या जबाबाशी विसंगत कथन करीत असल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली.)***

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. ३०/०७/२०२३ रोजी पोलीसांनी मला टाकपुरा येथील रोडवर घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, दि. ३०/०७/२०२३ रोजी पोलीसांनी मला जप्ती पंचनामा करण्यासाठी बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझे समक्ष आरोपी क्र. २ याचे ताब्यातुन एक लोखंडी रॉड जप्त केला होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझे समक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला होता व तो मला वाचुन दाखवण्यात आला व त्यानंतर मी त्यावर सह्या केल्या होत्या. मी आरोपींना ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना वाचण्यासाठी खोटी साक्ष देत आहे. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी** — दोन्ही आरोपीतर्फे ॲड. श्री. एस. जी. कुळकर्णी यांचे मार्फत नाकारण्यात आली.

**फेरतपासणी** — काही नाही.

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

(ए.ए. माळी)

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

(न्यायालय क्र. २)

अकोट, ता. आकोट, जि. अकोला.

दि. ३१.०७.२०२५

अकोट

**RCC No. 244/2023**
**Evidence/Exh. 20**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F file Evidence are same word to word as per the original evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | P. N. DURATKAR |
| Court Name | : | 2nd Joint Civil Judge (Jr.Dn.) & JMFC, Akot, Tq. Akot, Dist. Akola |
| Date of decision | : | 31/07/2025. |
| Evidence Signed by P.O on | : | 31/07/2025. |
| Evidence Uploaded on | : | 02/08/2025. |